दै. मराठवाडा दि. 16/01/2025

# चारच दिवसांत 'स्थागुशा'ने केला खुनाचा उलगडा

नांदेड (प्रतिनिधी) – नांदेड शहरालगत असलेल्या माळटेकडी परिसरात दि. ११ जानेवारी रोजी एकाची धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली होती. या हत्येचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या चारच दिवसांत केला आहे. पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या टीमने ही महत्त्वपूर्ण कामगिरी केली असून आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

माळटेकडी परिसरात दि. ११ जानेवारी रोजी पुलाजवळ शेख सिद्दीक शेख सादिक (वय ३८) याचा मृतदेह आढळला होता. शेख सिद्दीक याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून त्याचा खून करण्यात आला होता. याप्रकरणी शेख सिद्दीकचा भाऊ शेख अमीर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस

शेख सिद्दीक शेख सादिकची किरकोळ कारणातून हत्या



ठाण्यात अज्ञात मारेकऱ्यांविरूद्ध दि. १२ जानेवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश चव्हाण यांच्याकडे देण्यात आला होता. दरम्यान, या गुन्ह्याचा समांतर तपास करण्यासाठी पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशित केले होते.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी तपासाची चक्र गतिमान करून आरोपीचा माग काढण्यासाठी आपल्या टीमला सूचना केल्या होत्या. पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या टीमने या खुनाचा उलगडा केला असून, मिल्लतनगर येथून शेख मोईन शेख मेहबूब या आरोपी ताब्यात घेतले आहे. अत्यंत किरकोळ कारणातून सिद्दीकचा खून केल्याची कबुली आरोपीने दिली असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेकडून देण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या टीमने केली आहे. या टीममध्ये मिलिंद सोनकांबळे, रविशंकर बामणे, राहुल लाठकर, तिरूपती तेलंग आणि दीपक ओढणे यांचा समावेश होता.

दै. मराठवाडा दि. 16/01/2025

# जबरी चोरीतील आरोपीला अटक

नांदेड (प्रतिनिधी) – विमानतळ पोलीस ठाणे हद्दीत खंजर दाखवून जबरी चोरी करणाऱ्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपी निष्पन्न करून, गुन्ह्यातील मोबाईलसह एकास पकडण्यात आले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेऊन त्यांच्याविरूद्ध कार्यवाही करण्याचे आदेश पोलीस दलास देण्यात आले आहेत. यानुसार स्थानिक गुन्हा शाखा पोलिस निरीक्षक उदय खंडेराय यांनी उपनिरीक्षक



स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

साईनाथ पुयड यांचे पथक तयार केले. या पथकाने दि. १३ जानेवारी रोजी सदर पथक नांदेड शहरात पेट्रोलिंग करीत होते. यावेळी मिळालेल्या गोपनीय माहितीवरून गाडेगाव परिसरातून शेख सोहेफ शेख रहिम (वय १९, धंदा : मिस्त्री काम, रा. मिल्लतनगर) यास पकडण्यात आले. त्याच्याकडून एक विवो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. तो आरोपीने काही दिवसांपूर्वी त्याचा एक साथीदार शेख अमजद रा. मजहर कॉलनी, नांदेड याच्यासोबत एका इसमास खंजर दाखवून काघेतला होता. याबाबत दि. ३ डिसेंबर रोजी पो. स्टे विमानतळ येथे गुरनं ४९१/२०२४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. पुतपासकामी आरोपीस विमानतळ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

या कारवाईत उपनिरीक्षक एस.व्ही. पुयड, अंमलदार किशन मुळे, बालाजी तेलंग, तिरूपती तेलंग, विलास कदम, संदीप घोगरे, संतोष बेल्लूरोड, बालाजी कदम, अमोल घेवारे, महिला पोलीस अंमलदार शितल सोळंके व सायबर सेल येथील राजेंद्र सिटीकर व दीपक ओआदींनी सहभाग घेतला.